|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

---

जा.क्र. कबचौउमवि/११/ संशोधन विभाग /१५९९ /२०२० दि.१५/०६/२०२०

**परिपत्रक क्र. १५९७/२०२०**

**विषय**: विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/संशोधन केंद्र येथे संशोधन करणा-या विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. मौखिक परीक्षे (Viva-Voce) बाबत...

शासनाने लॉकडॉऊन संदर्भात सुधारित मार्गदर्शकतत्त्वे लागू केलेली आहेत. या अनुषंगाने विद्यापीठाने विद्यापीठ परिपत्रक क्र. १६७/२०२०, दि. ०१/०६ /२०२० अन्वये विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/संशोधन केंद्र दि.०१ जून २०२० ते दि. ३० जून, २०२० या कालावधीत शैक्षणिक कामाकाजाकरीता बंद राहतील परंतु सदर कालावधीत आवश्यकतेनुसार ऑनलाईन/दुरस्थ माध्यमातुन शैक्षणिक कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

शासनाने मार्च २०२० मध्ये कोव्हिड - १९ च्या प्रादुर्भाव व तद्अनुषंगाने घोषित केलेल्या लॉकडाऊन पूर्वी शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/संशोधन केंद्र येथे पीएच.डी. संशोधन करणा-या काही संशोधक विद्यार्थ्यांचे संशोधनाचे काम पूर्ण झाल्यामुळे विहित कार्यपध्दती अवलंबून मौखिक परीक्षांच्या (Viva-Voce) तारखा निश्चित करण्यात आलेल्या होत्या. तथापि, लॉकडॉऊनमुळे निश्चित केलेल्या मौखिक (Viva-Voce) स्थगित करण्यात आल्याने याबाबतची प्रक्रिया पूर्ण करता आलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली मार्गदर्शक तत्त्वे तसेच शासनाने दिलेल्या सुचनेनुसार पीएच. डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा (Viva-Voce) व्हिडीओ कॉन्फरंसिंगव्दारे घेता येणार आहेत.

तरी, या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, ज्या संशोधक विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा (viva-voce) स्थगित करण्यात आलेल्या आहेत तसेच ज्या विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य पूर्ण झालेले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा (viva-voce) विहित केलेली प्रक्रिया पूर्ण करुन पुढील आदेश येईपर्यंत व्हिडीओ कॉन्फरंसिंगव्दारे घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. त्यासाठी संशोधक मार्गदर्शकांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. यापूर्वी ज्या संशोधक मार्गदर्शकांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम मौखिक परीक्षा (viva-voce) विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत आयोजित करण्यासंदर्भात विद्यापीठाने पत्राव्दारे दिनांक व वेळ कळविलेली आहे, किंवा ज्या संशोधक विद्यार्थ्यांचे मौखीक परीक्षेचे आयोजन करावयाचे आहे अशा संशोधक मार्गदर्शकांनी पुन:श्च समितीचे चेअरमन व बहिस्थ परीक्षक यांची नव्याने तारीख घेवून किमान एक आठवडा अगोदर विद्यापीठास ई-मेलव्दारे कळविण्यात यावी.

२. यासंदर्भात ई-मेलव्दारे अंतिम मौखीक परीक्षेचा दिनांक कळविल्यानंतर संबंधित मार्गदर्शकांना व समिती सदस्यांना व संशोधक विद्यार्थ्यास संशोधन विभागाकडून ई-मेलव्दारे कळविण्यात येईल.

३. संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांची अंतिम मौखीक परीक्षा ( Open Defence अंतर्गत इतर संशोधक विद्यार्थी, शिक्षक इ. यांना देखील अंतिम मौखीक परीक्षा vivo voce उपस्थित राहण्यासाठी विनंती करावी.) ही व्हिडीओ कॉन्फरंसिंगव्दारे Google MEET, Skype, Microsoft Teams

किंवा तत्सम खात्री लायक तंत्रज्ञान वापरुन विद्यापीठ अनुदान आयोग विनियम २०१६ मधील मुद्दा ९.६ ते ९.९ चे पालन करुन पार पाडावी.

४. यासंदर्भात संशोधक मार्गदर्शकांनी इलेक्ट्रॉनीक रेकार्ड जसे मुलाखतीचे video recording केलेली CD, व्हिडीओ कॉन्फरंसिंग करीता जे तंत्रज्ञान (Google MEET, Skype, Microsoft Teams किंवा तत्सम खात्री लायक तंत्रज्ञान) वापरले असेल व त्यांची link व ती link ज्या संबंधितांना पाठविलेली असेल त्यासंदर्भातील पुरावे विद्यापीठास ई-मेलव्दारे सादर करावे व त्याची Hard copy विद्यापीठ कार्यालयाचे दैनंदिन कामकाज सुरु झाल्यावर उलट टपालाव्दारे जमा करावी.

५. संशोधक मार्गदर्शक, बहिस्थ परिक्षक व चेअरमन यांना ई-मेल सोबत अहवालाची प्रत पाठविण्यात येईल. त्यात माहिती भरुन स्पष्ट शिफारशीसह pvcresearch@nmu.ac.in या ई-मेलवर त्याच दिवशी (Viva -Voce च्या तारखेस) पाठवावा व त्याची hard copy स्वाक्षरी करुन टपालाद्वारे पाठवावी.

६. मौखिक परीक्षा (Viva-Voce) साठी विद्यार्थ्यांनी Ph.D. Page वर जाऊन Viva-Voce साठी निश्चित केलेले शुल्क व त्यांचेकडे काही शुल्क बाकी असेल ते (त्यांच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे) ऑनलाईन पध्दतीने Debit/Credit/ Net Banking इ. व्दारे भरावे व त्यांचे ई- चलन मौखिक परीक्षे पूर्वी pvcresearch@nmu.ac.in. या ई-मेलवर पाठविणे बंधनकारक राहील. त्यासाठी संशोधक विद्यार्थ्याने स्वतःच्या Login मध्ये जाऊन Online yearly fees & other fees payment हया Link वर जाऊन Click करावे त्यानंतर येणा-या Screen वर Select type of fee to be paid online समोर आपल्याला जे शुल्क भरावयाचे आहे ती select करावी व पुढील payment प्रक्रिया पुर्ण करावी. (एका वेळी एकच पर्याय निवडता येत असल्याने उर्वरित Fee साठी पुनश्चः वरीलप्रमाणे प्रक्रिया करावी). यानंतर Login मधील online yearly fees and other fees payment details वर click करुन येणा-या screen वरुन Print receipt ला click करुन printout काढून Scan करुन किंवा pdf करुन त्याची Soft copy, pvcresearch@nmu.ac.in या ई-मेल वर पाठवावी.

७. Pre-Submission सादरीकरणासाठी देखील मौखिक परीक्षेची प्रक्रिया वरीलप्रमाणे राबविण्यात येईल. **(परंतु संशोधक मार्गदर्शकाने Synopsis (अंतिम गोषवारा) व Draft Thesis (कच्चा प्रबंध) यांची pdf स्वरुपातील प्रत संबंधित समितीतील तज्ज्ञांना किमान एक आठवडा अगोदर ई-मेल द्वारा पाठवावी.)**

आदेशान्वये

( वि.व.तळेले)

**सहा.कुलसचिव (संशोधन)**

प्रत:

१. मा. संचालक/मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठातील शैक्षणिक प्रशाळा/ विभाग प्रमुख, कबचौउमवि, जळगाव

२. मा. प्राचार्य/संचालक, क.ब.चौ.उ.म. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था/ मान्यताप्राप्त संशोधन केंद्र. - आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या प्रशाळा/ विभाग/महाविद्यालय/ परिसंस्थेमधील संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शक व पीएच. डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.